सम्यक
संवाद व संसाधन केंद्र, पुणे

# मर्जी

## माझ्या शरीरावर माझा हक्क

एप्रिल - जून, २०१६
अंक चौथा

### संपादकीय

मर्जी वार्तापत्राचा हा चौथा अंक. या आधीच्या अंकांमधून आपण सुरक्षित गर्भपात आणि त्याच्याशी संबंधित विविध विषयांसंदर्भात आपल्याबरोबर संवाद साधण्याचा प्रयत्न आम्ही करत आलो आहोत. या अंकामध्ये 'लिंगनिदान' या अतिशय संवेदनशील विषयासंदर्भात काही विश्लेषण आपणासमोर मांडत आहोत.

मुली नकोशा असण्याचा मोठा इतिहास भारतीय समाजाला आहे. सन १८७० मध्ये ब्रिटीश सरकारने "Female Infanticide Prohibition' हा कायदा लागू केला होता. भारतामध्ये विविध ठिकाणी मुली जन्माला आल्यानंतर त्यांना मारुन टाकले जायचे. या रिवाजाला आळा घालण्यासाठीचा हा कायदा! मुली नाहीशा करण्याचे किंवा संपविण्याचे विविध मार्ग समाजात कायमच वापरले गेले असे आपल्याला दिसेल आणि या सर्वाला कारणीभूत पितृसत्ताक समाजरचना आहे. ज्यामध्ये मुलींचा कधीच स्वीकार नव्हता. त्यांना कायम परावलंबी, परक्याचे धन समजले गेले आणि त्यामुळेच स्त्रियांवरील अन्यायाचा आणि शोषणाचाही मोठा इतिहास असल्याचे आपल्याला दिसते. १९८० च्या दशकात गर्भाचे लिंगनिदान चाचण्यांचा वापर केला जातो असे लक्षात आले. गरोदर असतानाच विविध चाचण्यांच्या माध्यमातून गर्भाचे लिंग तपासले जायचे आणि त्यानंतर जर स्त्री भ्रूण असेल तर गर्भपातही केला जायचा. त्यानंतर सोनोग्राफी तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराने लिंगनिवडीचे प्रमाणही वाढले. आगोदरच पितृसत्ताक असलेल्या समाजाला तंत्रज्ञानाची साथ मिळाल्याने विषमतेची पाळेमुळे अधिकच खोल रुजली गेली.

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील ० ते ६ वर्षे वयोगटातील मुला मुलींचे लिंगगुणोत्तर १०००:९२९ आहे असे दिसते. लिंगगुणोत्तरामध्ये होणारी सततची घट हा काळजीचा मुद्दा आहेच, परंतु त्याला फक्त लिंगगुणोत्तराच्या चष्म्यातून न पहाता लिंगभाव असमानतेच्या दृष्टीकोनातून त्याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. मुलगी जन्माला आल्यानंतर तिचे या पितृसत्ताक समाजातील भविष्य काय असणार याचा गांभीर्याने विचार केला गेला पाहिजे. तिचे शिक्षण, पोषण, आरोग्य आणि विकास अशा अनेक गरजा कशा पूर्ण होतील यासाठी सरकार आणि समाजातील सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. मुलींची संख्या वाढावी यासाठी जितक्या काटेकोरपने PC-PNDT कायद्याची अंमलबजावणी केली जाते तितक्याच काटेकोरपणे मुलींची तस्करी, बालविवाह, हुंडा विरोधी कायदा यांसारख्या सामाजिक मुद्द्यांसंदर्भातील कायद्यांची अंमलबजावणी करायला हवी. कारण जोवर मुलीबद्दलचा सामाजिक दृष्टीकोन बदलत नाही तोवर या ना त्या मार्गाने त्यांच्यावर अन्याय होतच राहतील.

सध्या लिंगनिदान विरोधी कायद्याची कडक अंमलबजावणी शासनामार्फत केली जात आहे. या निमित्ताने राबविल्या जाणाऱ्या जनजागृती अभियानांची भाषा मात्र पितृसत्ताक आहे. समाजातील मुलींचे उपयोगिता मूल्य ठळक करणारी आहे. यावर मात्र सर्वांनीच गंभीर विचार करायला हवा. याबरोबरच लिंगनिदानाला विरोध करता करता अनेकजण सुरक्षित गर्भपातालाच विरोध करत आहेत. अनेक डॉक्टर्स गर्भपाताच्या सेवा द्यायला नकार देतात आणि शासन वेगवेगळ्या मार्गांनी गर्भपाताच्या सेवा नियंत्रित करत आहे. त्यामुळे गर्भलिंगनिदान आणि सुरक्षित गर्भपात या मुद्द्यांकडे जर वेगळेपणे पहिले गेले नाही तर येत्या काळात असुरक्षित गर्भपातांचे प्रमाण वाढण्याची मोठी भीती आपल्यासमोर उभी आहे!

■■■

## डोकावून पहा

। संपादकीय ....१
। **विवेचन**
'स्त्रीभ्रूण हत्येमागचे'
पितृसत्ताक राजकारण ...२
। **आम्ही कुठं जायचं?** ...३
। **इतिहासाच्या झरोक्यातून**
सुरक्षित गर्भपाताच्या हक्कासाठी
स्त्रियांनी उभारलेले लढे ...४
। **वार्तांकन**
जन वकालत : एक पाऊल पुढे... ...६
। **प्रतिक्रिया** ...७
। **'मर्जी' : माझ्या शरीरावर माझा हक्क!** ...८

## खरंच की !




चित्र : वृषाली जोशी

विवेचन

# ‘स्त्रीभ्रूण हत्येमागचे’ पितृसत्ताक राजकारण



डॉ. मेघा पानसरे

पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीला प्रदीर्घ काळापासून दुय्यम स्थान आहे. तिला सर्वच स्तरांवर लिंगभेदाचा सामना करावा लागतो. जन्म व मृत्यू दरातील विषमता, आत्मविकासासाठी मूलभूत सुविधांची आवश्यकता विशेषत: असमान शिक्षणाच्या संधी, रोजगार व व्यवसायिक क्षेत्रात असमानता, मालकी हक्काची असमानता, कुटुंबव्यवस्थेतील विषमता अशा अनेक बाबींमध्ये दृश्य व अदृश्य स्तरावर लिंगभेद असल्याचे आपण पहातो. स्त्रिया पुरुषांच्या तुलनेत कमकुवत, परावलंबी व दुय्यम दर्जाच्या आहेत असा समज अगदी आदीम काळापासूनच समाजमनात रुजला आहे. खरंतर मानवी सभ्यतेच्या अगदी प्राथमिक काळात स्त्रियांनी अनेक महत्त्वाच्या भूमिका बजावल्या आहेत असं समाजविज्ञान सांगते. त्यानंतरच्या मानवी समाजविकासाच्या टप्प्यांमध्ये खाजगी मालमत्तेचा उगम, विवाहसंस्थेचा उदय, भारताच्या संदर्भात जातीव्यवस्थेचा उदय, पितृसत्तेचा उगम आणि त्याला मिळालेली धर्मसंस्थेची जोड, परिणामी स्त्रीचं सामाजिक उत्पादानातून, कुटुंबात बंदिस्त होणं आणि हजारो वर्षे मानसिक गुलामीत रहाणं हा इतिहास आजही शालेय आणि उच्च-शिक्षणामधून सकसपणे व प्राधान्याने शिकवला जात नाही व समजातही यावर चर्चा होताना दिसत नाही. याचाच परिणाम म्हणून असंख्य स्त्रिया आजही दुय्यम, शोषितांच जीणं जगत आहेत. आज आपल्याकडे कायद्याने बंदी असतानादेखील विविध बेकायदेशीर मार्गांनी केले जाणारे लिंगनिदान आणि स्त्रीलिंगी गर्भपात, अनेक वर्षांपासून या समाजात स्त्री-पुरुषांमध्ये केला जाणारा भेदभाव आणि विषमतेचा परिणाम आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

खरंतर ‘माझ्या शरीरावर माझा अधिकार’ ही घोषणा स्त्रीवादी चळवळीने ठळकपणे समाजासमोर मांडली आहे. परंतु तरीही संतती नियमन, गर्भधारणा वा अपत्याचा जन्म इत्यादी पुनरुत्पादनशी संबंधीत गोष्टींत स्त्री- शरीर विविध सांस्कृतिक बंधनात अडकलेलं आहे. ‘मुलगी नको मुलगा हवा’ ही मानसिकता स्त्रिचा मातृत्वाचा नैसर्गिक हक्कही नाकारते. मुलीस जन्म देणाऱ्या मातेला मुलाच्या मातेपेक्षा समाजात, कुटुंबात कनिष्ठ दर्जा आणि धार्मिक-कौटुंबिक सण व उत्सवात दुय्यम स्थान दिले जाते. दोन वा जास्त मुली असणाऱ्या मातेस कुटुंबात हीन वागणूक मिळते. मुलगा होण्याच्या अपेक्षेत तिच्यावर कित्येकवेळा गर्भधारणा, गर्भपात व बाळंतपण लादले जाते. परिणामी अनेक स्त्रिया स्वत:च स्त्रीलिंगी भ्रूणाच्या निदानान वा मुलीच्या जन्मानं दु:खी होतात. कोल्हापुरात स्वत: आईनेच स्वत:च्या नवजात मुलीची जन्मानंतर हत्या केल्याच्या घटना घडलेल्या आपण ऐकल्या असतील. अशा स्त्रीसंबंधी ‘अतिशय क्रूर जन्मदात्री’ असे उल्लेख अनेक बातम्यांत प्रसिद्ध केले गेले. परंतु एखाद्या स्त्रीला स्वत:चे मूल मारून टाकावे असे वाटणे हेच मुळात विचारांनी कलुषित असलेल्या समाजाचे लक्षण आहे असे म्हणावे लागेल. मुलगी झाली तर पुन्हा घरी, सासरी जाता येणार नाही, माहेरी राहून अपमानित जीणं स्वीकारावं लागेल याचं भय स्त्रीला असे अमानवी कृत्य करण्यास भाग पडतं.

आपण सर्वांनी पाहिले आहे की, १९८० नंतर आपल्याकडे सोनोग्राफीचे तंत्र वापरात आले या आधुनिक वैद्यक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं प्रसूतीपूर्व लिंगनिदान करून स्त्रीलिंगी गर्भपातांच प्रमाण राज्यात वाढलं. याचाच परिणाम म्हणून २००१ च्या जनगणनेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील दर १००० मुलांमागे मुलींचे प्रमाण ९३१ (जनगणना २००१) वरून ८३९ इतके कमी झाल्याचं निष्पन्न झालं, आणि अनेक संवेदनशील स्त्री संघटनांचे कार्यकर्ते कमालीचे चिंतीत झाले. राज्यात १९९१ च्या तुलनेत मुलींच्या प्रमाणात १०० पेक्षा जास्त घट झालेले नऊ तालुके होते. त्यात पन्हाळा, कागल, राधानगरी व करवीर हे चार तालुके कोल्हापुरातील होते. या परिस्थितीला आटोक्यात आणण्यासाठी समाजातील विविध गटांमधील लोकांबरोबर काम करणे गरजेचे आहे असे आम्हाला वाटू लागले आणि याच पार्श्वभूमीवर कोल्हापूर परिसरातील स्त्री-संघटनांच्या मदतीने या गंभीर परिस्थितीचा वेध घेण्याचा प्रयत्न सुरु झाला.

भारतीय महिला फेडरेशन ने २००७-०८ या कालावधीमध्ये संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी (UNFPA) या संस्थेसोबत पन्हाळा तालुक्यात ‘कन्या वाचवूया’ ही व्यापक मोहीम राबवली. या अंतर्गत ‘कन्या वाचवूया’ या विषयावर शालेय व महाविद्यालयीन तरुणांबरोबर एक पथनाट्य बसविण्यात आले. या नाटकाचे १०० पेक्षा जास्त प्रयोग पन्हाळा तालुक्यात खेडोपाडी करण्यात आले. या नाटकांच्या माध्यमातून प्रचलीत पितृसत्ताक व्यवस्था, कुटुंबातील स्त्री-पुरुष विषमता, स्त्रियांना गर्भपाताची असणारी गरज आणि गर्भपाताचा कायदा, समाजात मुलाच्या जन्माइतकच मुलाच्या जन्माचं महत्व

■■■

अशा विविध मुद्यांवर सर्वच स्तरांतील लोकांच्यात एक वैचारिक मंथन घडवून आणण्यासाठी भारतीय महिला फेडरेशन सदैव प्रयत्नशील राहिली आहे. याच मोहिमेअंतर्गत पन्हाळा तालुक्यातील २२० अंगणवाडी व बालवाडी शिक्षक आणि वकीलांबरोबर PCPNDT कायद्यासंदर्भात कार्यशाळा घेण्यात आल्या व स्टिंग operation करून बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणारे अनेक डॉक्टर्स पकडून देण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी काम केले.

गेल्या दहा वर्षात लिंगनिदान आणि स्त्रीलिंगी गर्भपाताविरोधात भारतीय महिला फेडरेशनने उभ्या केलेल्या चळवळीचा लेखा-जोखा घेत असताना असे जाणवते की, स्त्री चळवळीचे अनेक उपक्रम व संघर्ष यांतून काही ना काही मुल्ये समाजमनात झिरपतात म्हणून अशा चळवळी सतत भक्कम करत रहाणे हे सर्व स्त्रीवादी संघटनांचे प्रमुख काम असायला हवे. याचबरोबर 'मुलगी नको' ही मानसिकता बदलण्यासाठी प्रबोधन करण्याच्या दीर्घ चळवळीबरोबरच PCPNDT कायद्याच्या अंमलबजावणी-साठी आणि बेकायदेशीर लिंगनिदान करणाऱ्या डॉक्टर्सना कडक शिक्षा करण्यासाठीही येत्या काळात अनेकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

■■■



**स्त्रियांच्या आरोग्याच्या संदर्भात वैद्यकीय अधिकारी श्री. मुधोळकर, प्राथमिक आरोग्य केंद्र, मंगळूर, जि. उस्मानाबाद यांच्या सोबत सुरक्षित गर्भपात या विषयावर चर्चा करताना मराठवाडा गटसदस्य बळीराम जेठे**

## आम्ही कुठं जायचं?

मीना (नाव बदलले आहे) २५ वर्षांची आहे. मीनाच्या घरी सात लोक आहेत, तिला २ मुली आहेत. लग्नानंतर एक वर्षाच्या आत मीनाला मुलगी झाली त्यानंतर दोन वर्षांनी दुसरी मुलगी झाली. दुसऱ्यांदा मुलगी झाल्यानंतर मीनाच्या घरचे थोडे नाराज झाले होते आणि तिसऱ्या वेळेस मुलगा व्हावा अशी अपेक्षाही करत होते. मीनाला पुन्हा एकदा मूल नको होते पण ती तिसऱ्या वेळेस पुन्हा गरोदर राहिली. ती सांगते की, 'कंडोम वापरत असताना देखील तिसऱ्या वेळेस मी गरोदर राहिले'.

तिसऱ्या वेळी २ महिने झाल्यानंतर मीनाला ती गरोदर असल्याची जाणीव झाली आणि यावेळेस तिने गर्भपात करायचे ठरवले. घरची परिस्थिती बेताचीच असल्याने मीना सरकारी दवाखान्यात गेली. तिकडे गेल्यावर तिला समजले की डॉक्टरांचा संप सुरु आहे आणि किमान आठ दिवस तरी काही होऊ शकणार नाही. मीना परत घरी आली आणि एक महिन्यानंतर पुन्हा एकदा दवाखान्यात गेली. मधल्या वेळेत गर्भपात करायचा की नाही या विचारात तिने अनेकांचे सल्लेही घेतले आणि प्रत्येकजण तिला गर्भपात न करण्याबद्दल सुचवत होते. यावेळी तुला नक्की मुलगा होईल अशी खात्रीही देत होते.

पुन्हा एकदा दवाखान्यात गेल्या नंतर डॉक्टरांनी तिला सोनोग्राफी करायला सांगीतली. रिपोर्ट आल्यानंतर तिला थोडा वेळ बाहेर बसायला सांगितले आणि नंतर आत बोलावले. मीना सांगते 'डॉक्टरने माझी खूप चौकशी केली, कुठे रहाता? बरोबर कोण आहे? किती मुले आहेत? इ. प्रश्न विचारले आणि शेवटी म्हणाले की तुम्ही दुसरी कडून मुलगा- मुलगी तपासून आला नसाल कशावरून? इथे तुमचा गर्भपात होणार नाही. तो कायद्याने गुन्हा आहे आणि तुम्ही असं काही केलंत तर पोलीस तुम्हाला अटक करू शकतात'.

डॉक्टरच्या या बोलण्याने मीना घाबरली आणि दवाखान्यातून घरी गेली. पण काहीही करून तिला गर्भपात करायचाच होता. तिने मेडीकलमधून पाळी येण्याच्या गोळ्या आणल्या आणि एकदम खाल्ल्या. पण त्यानंतरही काहीच झाले नाही. बोलत असताना मीना काळजीने म्हणत होती की, मी गोळ्या तर खाल्ल्या पण आता काळजी वाटते की जन्माला येणाऱ्या बाळाला काही त्रास तर होणार नाही ना?

■■■

# गर्भलिंगनिदान विरोधी अभियान : इतिहास व धोरण

**संदर्भ :** प्रस्तुत लेख स्त्री मुक्ती संघटनेचे मासिक 'प्रेरक ललकारी' मार्च-एप्रिल २०१२ मध्ये महिला दिन विशेषांकात 'लिंग निदान विरोधी अभियान इतिहास व धोरण' या नावाने प्रसिद्ध मुद्रित करण्यात आला होता. तो लेख या ठिकाणी पुन:मुद्रित केला आहे.

### अभियानाचा प्रारंभ:

गर्भलिंगनिदान विरोधी अभियानाचा प्रवास १९८० मध्ये सुरु झाला. कोणतेही अभियान चालवायचे असेल तर आपल्याला किमान एका पिढीएवढे म्हणजेच २०-२५ वर्षे काम करावे लागते. कदाचित जास्त सुद्धा. तरच ते जनमानसात रुजते. पंचवीस वर्षांपूर्वी गर्भलिंग चिकित्सा, निवडीबाबत कोणी ऐकून घ्यायला तयार नसत. या अभियानाचे महत्त्व लक्षात यावे म्हणून आम्ही कार्यकर्ते सतत लोकांशी बोलत होतो. या आंदोलनात डॉ. विभूती पटेल, रवींद्र रु. पं. होते. त्यावेळी अनेकजण आम्हाला तंत्रज्ञानविरोधी, डॉक्टर्सविरोधी विकासविरोधी एवढेच नव्हे तर स्त्री- विरोधीही म्हणायचे.

आम्ही १९८०-८१ मध्ये मुंबईमध्ये नागरी हक्क, आरोग्य हक्क आणि स्त्रीवादी चळवळीमध्ये सक्रीय होतो. त्यावेळी मुंबईतील एका बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये एक विचित्र पेच निर्माण झाला होता. कंपनीमध्ये काम करणाऱ्या पुरुषांच्या पत्नींच्या वतीने वैद्यकीय उपचारांची बिले वैद्यकीय खर्चाच्या भरपाईसाठी येत. त्यापैकी बरीच बिले गर्भपाताची होती. गर्भपाताआधी कोणतीतरी तपासणी केली जात होती असे निदर्शनास आले, कारण या तपासणीचीही बिले येत होती. काही वेळा अशा तपासण्यांच्या बिलांना जोडून गर्भपाताची बिले आणि काही वेळा फक्त तपासण्यांची बिले होती, मग हे काय गौडबंगाल आहे, हे जाणून घेण्यासाठी त्या बहुराष्ट्रीय कंपनीने एका स्त्री संघटनेला बोलावले. तिथे गेल्यावर लक्षात आले, की या तपासण्या म्हणजे प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान चाचण्या आहेत. ही घटना लिंगनिदान विरोधी अभियानाची सुरुवात होण्यासाठी महत्वाची ठरली.

अखिल भारतीय वैद्यकीय शास्त्र संस्था, नवी दिल्ली येथे गर्भाची वाढ नीट होत नसेल, गर्भामध्ये काही क्षमता कमी असल्यास त्या दुरूस्त करता येतील का, या दृष्टीकोनातून प्रसूतीपूर्व चाचण्या केल्या जात असत. या चाचण्या दोन प्रकारच्या होत्या. गर्भजल परीक्षा (amniocentesis) आणि गर्भाशयाजवळच्या पेशींची तपासणी (chorinic villi biopsy). सरकारी क्षेत्रामध्ये पहिल्यांदा या चिकित्सा उपलब्ध झाल्या. परंतु सरकारी वैद्यक क्षेत्रामध्ये कधीही गर्भलिंगनिदान चाचणी केली गेली नाही. जेंव्हा - IIMS कडे गर्भलिंग चाचणीच्या मागण्या यायला लागल्या, तेंव्हा त्यांना याचे गांभीर्य लक्षात आले.

१९८०-८१ मध्ये आमच्या निदर्शनास आले, की प्रसूतीपूर्व गर्भलिंग निवड चाचण्या केल्या जात आहेत, तोपर्यंत हे प्रकरण मोठ्या प्रमाणात फोफावले होते. हरियाना, पंजाबमध्ये मोठमोठे फलक लागायला लागले होते की, 'आता पाचशे द्या आणि उद्याचे पाच लाख वाचवा'. म्हणजे उद्या मुलीला हुंडा द्यावा लागेल तो वाचवण्यासाठी आज गर्भलिंग निदान करून मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात करून घ्या. अशा मोठमोठ्या जाहिराती उघडपणे तिकडे दिसायला लागल्या होत्या. मुंबईमध्ये हे वास्तव लक्षात आले, त्या वेळी आम्ही एकत्र आलो आणि दोन मंच तयार केले; 'फोरम अगेन्स्ट सेक्स डीटरमिनेशन ॲण्ड सेक्स प्रिसिलेक्शन टेक्निक्स' हा एक आणि दुसरा 'डॉक्टर्स अगेन्स्ट सेक्स डीटरमिनेशन ॲण्ड सेक्स प्रिसिलेक्शन टेक्निक्स'. या दोन मंचांमार्फत लिंगनिदानविरोधी चळवळीचे काम सलगतेने चालू झाले.



डॉ. मनिषा गुप्ते, मासूम

### अभिनयाचे कार्यक्रम:

१९८२ ते १९८६ या दरम्यान आम्ही अभियानाने अनेक कार्यक्रम घेतले. त्यापैकी काही म्हणजे बालदिनाच्या दिवशी मानवी साखळी, संस्थामध्ये आणि कॉलेजमध्ये जाऊन या प्रश्नावर बोलणे, पत्रके वाटणे, व्यंगचित्रे तयार करणे, लेख लिहिणे वगैरे. त्यावेळी प्रसार माध्यमांनीही हा प्रश्न उचलून धरला होता. टाइम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, हिंदू, टेलिग्राफ, हिंदुस्थान टाइम्स या सर्व वृत्तपत्रांनी अभियानातील आम्हा कार्यकर्त्यांकडून विस्तृत लेख लिहून घेतले. या सर्व लेखांना संपादकीय पानावर स्थान देण्यात आले होते.

### सोनोग्राफीचा वाढता वापर:

प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदानाबरोबरच गर्भधारंणेपुर्वी गर्भलिंग निवड करण्याचे तंत्रही त्या काळामध्ये भारतात पोहोचले होते. या तंत्राच्या माध्यमातून दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यात गर्भाचे लिंग ओळखून गर्भापात केला जायचा. त्यानंतर सोनोग्राफीचा वापर वाढू लागला पण गर्भलिंगनिदान चौथ्या ते पाचव्या महिन्यात करता यायचे. याचा फायदा असा होता की, सोनोग्राफी तपासणीमध्ये गर्भलिंगनिदान केल्याचा पुरावा आपल्याला सहजासहजी मिळू शकत नाही. शिवाय तपासणी करणाऱ्या व्यक्ति थेट लिंगनिदान सांगायच्या नाहीत, तर त्यासाठी काही सांकेतिक शब्द वापरले जायचे. उदाहरणार्थ, मुलगी असेल तर 'शुक्रवारी या' आणि मुलगा असेल तर 'सोमवारी या' इत्यादी. काही ठिकाणी पॅकेजच्या स्वरुपात या तपासण्या करून दिल्या जायच्या आणि आजही दिल्या जातात.

### कायद्याची लढाई:

कायद्यातील उणिवांमुळे त्याची योग्य अंमलबजावणी झाली नाही. तसेच सरकारचे लोकसंख्या नियंत्रणाचे धोरण धाकदपटशाहीचे असल्यामुळे गर्भलिंगनिदान चाचण्यांवर नजर ठेवण्याऐवजी कानाडोळा करण्यात आला. 'एका बाजूला दोन मुलगे हवेत' असा कुटुंबाचा आग्रह आणि दुसऱ्या बाजूला 'दोन पेक्षा जास्त

मुले नकोत' हे सरकारचे धोरण. आग्रह आणि धोरण या तारेवरच्या कसरतीत बाई अडकलेली. यामुळे आम्ही अभियानातले कार्यकर्ते फार बेचैन व्हायला लागलो. १९९९ च्या सुमारास आम्ही एक जनहित याचिका करण्याचा विचार केला. सेंटर फोर इनक्कायरी इंटू हेल्थ ॲण्ड अलाईड थीम्स (सेहत), मुंबई आणि महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम), पुणे या दोन स्वयंसेवी संस्था एकत्र आल्या. डॉ. साबू जॉर्जही आले. २००० मध्ये सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. लॉयर्स कालेक्टीव्हच्या वकील इंदिरा जयसिंग यांनी ही केस लढवली. या याचिकेद्वारे भारत सरकारला तीन प्रश्न विचारण्यात आले होते.

१) या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होताना दिसत नाही. त्यामुळे तुम्ही हा कायदा गांभीर्याने घेतला आहे यावर नागरिकांनी विश्वास कसा ठेवावा?

२) स्त्रिया अतिशय बिकट परिस्थितीया चाचण्या करून घ्यायला येतात, हे माहीत असताना तपासणीसाठी येणाऱ्या स्त्रीला या कायद्यांतर्गत शिक्षा का ठेवली आहे?

३) गर्भधारणापूर्व गर्भलिंगनिवड चाचण्यांचा या कायद्यात समावेश का करून ठेवली आहे?

ही याचिका दाखल झाली आणि लागोलाग २००१ मध्ये जनगणना सुरु झाली. या जनगणनेचा निष्कर्ष पाहून सरकारला या प्रश्नाचे गांभीर्य नाकारताच आले नाही. त्यामुळे ही जनहित याचिका २००० मध्ये दाखल करणे हा आणखी एक ऐतीहासिक क्षणच म्हणावा लागेल. सुनावणीच्या दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने २००२ मध्ये सरकारला आदेश दिले त्यानुसार २००३ मध्ये कायद्यात दुरुस्ती केली गेली आणि कायद्याचे नाव 'गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान तंत्र कायदा (गर्भलिंगनिवड प्रतिबंध) कायदा' असे करण्यात आले. याचबरोबर कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी अनेक नियमही करण्यात आले.

### समाजाची मानसिकता:

या प्रश्नाकडे थोडे मागे वळून पहिले तर असे लक्षात येईल, की आपल्या समाजात ही समस्या नव्याने निर्माण झालेली नाही. जनसंख्येतील स्त्रियांची घट १९०१ पासून आपल्याला दिसते आहे. जगात बहुतेक ठिकाणी १००० पुरुषांमागे १००० पेक्षा जास्त स्त्रिया असतात. पण काही देश असे आहेत की, (दुर्दैवाने ते भारतीय उपखंडातले देश आहेत) या देशांमध्ये गेली शंभर, दोनशे वर्षे स्त्रियांच्या संख्या ही पुरुषांच्या तुलनेत कमीच राहिलेली आहे. भारतीय समाजाला हजारो वर्षांपासून पुत्र लालसा आहे, हे काही नव्याने सांगायला नको. समाजात स्त्री-पुरुष विषमता पूर्वापार आहे. पण १९७० च्या दशकात जे नवे तंत्रज्ञान कालांतराने सहज परवडण्याजोग्या पैशात सर्वांना उपलब्ध होऊ लागले आणि लाखोंच्या संख्येने मुलींचे गर्भ पाडण्यात आले. जनगणनेसाठी ही प्रचंड घट आपल्या निदर्शनास आली. मुलींची संख्या झपाट्याने कमी होताना आजही आपल्याला दिसते आहे.

### अभियानापुढील आव्हाने:

लिंगनिदानविरोधी अभियानामध्ये अनेकदा अतिउत्साहाच्या भरात गर्भपाताच्या सेवा बंद किंवा नियंत्रित कराव्यात असा सूर अनेक ठिकाणावरून आलेला दिसतो. सध्या तर स्त्रीला दुसऱ्या तिमाहित गर्भपाताच्या सेवा दिल्या जाऊ नयेत असेही म्हणले जाते. अनेक स्त्रियांना खाजगी व सरकारी दवाखान्यांमध्ये गर्भपाताच्या सेवा नाकारल्याही जातात. खरे तर सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताच्या सेवा व्यवस्थित उपलब्ध झाल्या तर असुरक्षित आणि बेकायदेशीररीत्या होणाऱ्या गर्भापातांवर मोठा आळा बसू शकेल. आपल्याला हे लक्षात घ्यावे लागेल की, आपले अभियान बाईच्या सुरक्षित गर्भपाताच्या हक्काविरोधी नसावे तर डॉक्टरांवर आणि बेकायदेशीर गर्भलिंगनिदान तंत्रज्ञानावर लक्ष ठेवणारे असावे. आपल्या अभियानाची भाषाही गर्भपात विरोधी नसावी. आपण बरीच पोस्टर्स बघतो ज्यामध्ये गरोदर बाईशी पोटातली मुलगी बोलत असते, 'आई मला मारू नको ग' असं म्हणत असते. यामुळे गर्भपात विरोधी भाषा समाजात मोठ्या प्रमाणावर पसरते आहे असे दिसते.

येत्या काळात आपल्या समोर लिंगनिदान विरोधी आणि सुरक्षित व कायदेशीर गर्भपाताला पाठींबा देणारी भाषा तयार करण्याचे आव्हान असणार आहे. याचबरोबर या प्रश्नावर खऱ्या अर्थाने तोडगा काढायचा असेल तर हुंडाबंदी, बालविवाह प्रतिबंधक कायदा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा यांसारख्या कायद्यांचीही काटेकोर अंमलबजावणी व्हायला हवी. समाजामध्ये पुरुष आणि स्त्रियांसाठी समान संधी आणण्यासाठी आणि समाजाची मानसिकता बदलण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करणे हे आपल्या समोरील येत्या काळातील आव्हान असणार आहे.

■■■



**मराठवाडा गट सदस्य तत्वशील कांबळे, 'स्त्री-आरोग्या'विषयींच्या चर्चेमध्ये महिलांना सुरक्षित व सन्मानजनक गर्भपाताच्या सेवांची गरज या विषयी मांडणी करतांना**



**पश्चिम महाराष्ट्र गटसदस्य ज्योती भालकर, गावपातळीवर घेतलेल्या मिटिंगमध्ये 'सुरक्षित गर्भपात' या विषयावर मांडणी करतांना**

# सुरक्षित गर्भपाताच्या सेवांसंदर्भात गावपातळीवर जनजागृती

लिंगनिदानाला विरोध करत असतानाच स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळायला हव्यात यासाठी 'मानिनी' आणि'उडाण' या गटसदस्यांनी या तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये जबाबदारी घेऊन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यास सुरुवात केली. क्षमता बांधणी कार्याशाळेनंतर 'मानिनी' गटातील सदस्यांचा सुरक्षित गर्भपाताच्या मुद्द्याकडे बघण्याचा बदललेला दृष्टीकोन आणि त्यांची वाढलेली समज बघता 'उडाण' गटाच्या सदस्यांकडून ही एक कार्यशाळा त्यांच्या बरोबर घेतली जावी अशी मागणी आली आणि सुरक्षित गर्भपाताच्या ॲडव्होकसीसाठी मदत करतील अशा आणखीही इतर व्यक्तींना सहभागी करून घेतले. या त्रैमासिकात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांचा थोडक्यात लेखा-जोखा पुढीलप्रमाणे.

**पश्चिम महाराष्ट्रातील संस्थांच्या सदस्यांबरोबर दोन दिवसीय कार्यशाळा:**

'सम्यक' ने पश्चिम महाराष्ट्रातील गटसदस्य यांच्या सोबत दि. ५ आणि ६ जून २०१६ रोजी कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेमध्ये सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, या चार जिल्ह्यातून एकूण १७ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

या कार्यशाळेमध्ये लिंगभाव आणि पितृसत्ता, लैंगिक आणि प्रजनन आरोग्य हक्क, सुरक्षित गर्भपाताच्या सेवा आणि सुविधा, सुरक्षित गर्भपाताचे प्रकार, गर्भनिरोधके, या विषयांबद्दल चर्चा करण्यात आली. याचबरोबर लिंगनिदानाचा मुद्दा आणि त्यामागचे पितृसत्ताक राजकारण याबद्दल प्रशिक्षणार्थींची समज वाढावी यासाठी मांडणी करण्यात आली. मिलिंद चव्हाण, मासूम, डॉ. निलांगी सरदेशपांडे, पुणे आणि प्रीत मंजुषा, सम्यक, पुणे यांनी कार्यशाळेदरम्यान प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये शेवटी सहभागींनी सुरक्षित गर्भपाताचा मुद्दा लोकांपर्यंत कसा पोहचविता येईल या विषयावर विविध कार्यक्रमांचे नियोजन केले. सुरक्षित गर्भपातासंदर्भात माहिती देणारे एखादे ॲप तयार करावे असा एक मुद्दा या चर्चेमध्ये मांडला गेला. गावांमध्ये लोकांपर्यंत आणि जिल्ह्यामध्ये अधिकारी यांच्यापर्यंत हा मुद्दा पोहोचविण्यासाठी पथनाट्य, फेरी, जनजागृती कार्यक्रम यांचे नियोजन केले गेले.

**त्रैमासिक बैठक: 'मानिनी' गटसदस्य:**

'मानिनी' गटातील सदस्यांची दि. ९ आणि १० जून २०१६ ला YMCA, रास्ता पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आली. सुरक्षित गर्भपात आणि गर्भलिंगनिदानाचा मुद्दा गावपातळीवर आणि सरकार यंत्रणांपर्यंत पोहचविण्यासाठी भविष्यात काय करता येईल याविषयी चर्चा करण्यात आली. मागील त्रैमासिकात मानिनी गट सदस्यांनी केलेल्या कामाचा आढावाही या बैठकीत घेण्यात आला.

बीड आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये सरकारी अधिकारी, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक, पत्रकार आणि सामाजिक संस्थापर्यंत 'गर्भलिंग निदानाला विरोध करत असतांना स्त्रियांना सुरक्षित पद्धतीने गर्भपाताच्या / गर्भ समापानाच्या सन्मानजनक सोयीसुविधा यासंदर्भात चर्चा केली, त्याचबरोबर 'मर्जी' हॉटलाईन ची माहिती दिली आणि स्टिकर्स लावले.

येत्या काळात प्रत्येक जिल्ह्यातील कलेक्टर (जिल्हाधिकारी), DHO, CEO, आणि सिव्हील सर्जन (CS) यांना गटाची भूमिका सांगणारी आणि काही मागण्यांचे निवेदन देण्यात येईल. याचबरोबर 'आपला गाव आपला विकास' या कार्यक्रमामध्ये प्रत्येक गटसदस्य स्त्री-पुरुष समानता, किशोरवयीन मुलांबरोबर जाणीव जागृती, स्त्री आरोग्य या विषयामध्ये महिलांना 'सुरक्षित गर्भपात' आणि 'गर्भनिरोधक' याबद्दल माहिती देणे आणि 'मर्जी' हॉटलाईनचा प्रचार आणि प्रसार करणे अशी विविध कामे मानिनी गट सदस्य करतील असा निर्णय मिटींगच्या शेवटी घेण्यात आला.

**'उडाण' आणि 'मानिनी' गटसदस्यांनी आयोजित केलेले विविध कार्यक्रम:**

ज्योती भालकर, पश्चिम महाराष्ट्र विभाग गटसदस्य हिने भारतीय महिला फेडरेशनच्या वतीने जून महिन्यात गावपातळीवर घेतलेल्या मीटिंगमध्ये ५०० ते ७०० महिलांना सुरक्षित गर्भपात या विषयावर मांडणी करून PCPNDT आणि MTP कायद्यामधील फरक आणि मर्जी हॉटलाईन याबद्दल माहिती दिली. याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि काही खाजगी रुग्णालयामध्ये मर्जी हॉटलाईन चे स्टिकर्स लावले.

बळीराम जेठे, मराठवाडा विभाग गटसदस्य यांनी १५ जून २०१६ रोजी स्त्रियांच्या आरोग्याच्या संदर्भात PMC चे मेडीकल ऑफिसर श्री. मुधोळकर याच्यासोबत झालेल्या मीटिंग मध्ये स्त्रियांच्या आरोग्याच्या मुद्याला घेवून चर्चा केली. त्या चर्चेमध्ये गर्भलिंग निदानाला विरोध करत असतांना स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सन्मानजनक सेवा मिळाव्यात यासंदर्भात आणि PCPNDT व MTP कायद्यामधील फरक या विषयावर चर्चा. 'मर्जी हॉटलाईन'ची माहिती दिली व ग्रामीण रुग्णालयात मर्जीचे स्टीकर लावले.

अशोक तांगडे, तत्वशील कांबळे आणि सीता बनासोड, मराठवाडा गटसदस्य यांनी २२ जून २०१६ रोजी स्त्री-आरोग्याच्या विषयी चर्चेमध्ये महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक गर्भपाताच्या सेवांची गरज याविषयी मांडणी केली. आशा, अंगणवाडी सेविका, बचतगट, शिक्षक त्यांचे अनुभव समजून घेतले. याचबरोबर PCPNDT आणि MTP या कायद्यामधील फरक सांगण्यात आला. 'मर्जी' हॉटलाईन बद्दल माहिती देण्यात आली आणि पोस्टर वाटण्यात आले. येत्या काळात बीड जिल्ह्यामधील सर्व अंगणवाड्यांमध्ये 'मर्जी' हॉटलाईनचे पोस्टर्स लावले जातील.



## डॉ. मेघना गुगळे

सेक्रेटरी, OBGY सोसायटी, लातूर

'सुरक्षित गर्भपात' व 'तिच्या शरीरावर तिचाच अधिकार' या संकल्पना 'सम्यक' ने समोर ठेऊन सुरु केलेली ही चळवळ अतिशय महत्त्वाची व कौतुकास्पद आहे. पी.सी.पी.एन.डी.टी. कायदा व एम.टी.पी. कायद्याची उजळणी करून दिली. सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळणे हा स्त्रियांचा अधिकार असला पाहिजे हे सामाजिक पातळीवर जाऊन त्याचे महत्त्व पटवून देण्याचे सम्यकचे काम कौतुकास्पद आहे. सोबतच डॉक्टरांना प्रत्यक्ष सेवा देत असताना येणाऱ्या अडचणी ते सरकार पर्यंत नेत आहे. मी लातूर येथील स्त्री रोग संघटनेची सेक्रेटरी आहे. सम्यकच्या मिटिंगमुळे झालेल्या सकारात्मक बदलाबाबत मला बऱ्याच डॉक्टर्सनी फोन करून सांगितले.

सम्यकच्या या सामाजिक चळवळीने आम्हाला जी PCPNDT मध्ये सुधारणा पाहिजेत त्याच्यात मदत होईल.



## ॲड. गौरी पाटील

PCPNDT कायदा सल्लागार, केल्हापुर

अलीकडेच गर्भपाताच्या कायद्यामध्ये सुधारणा होणार असल्याचे वृत्त ऐकले. गर्भपात कायद्यामध्ये बदल होण्याची गरज आहेच. परंतु सर्वसामान्य लोकांमध्ये गर्भपात हा गुन्हा आहे असा गैरसमज निर्माण झाला आहे हा गैरसमज कायद्याबाबतची अपूर्ण माहिती आणि गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायदा यांच्या चुकीच्या रीतीने लावला जाणारा संबध यामुळे निर्माण झाला आहे.

यासगळ्या समज-गैरसमजामुळे 'सुरक्षित गर्भपात' सेवा महिलांचा मिळाली पाहिजे ही गोष्टच मागे पडली आणि अजून मागे पडत आहे. फक्त गर्भलिंग निदान केल्यानंतरच गर्भपात करतात असा ही गैरसमज सामान्य माणसाच्या मनात रुजत गेला आहे. या सगळ्या प्रकारातून बाहेर पडून सुरक्षित गर्भपात हा महिलांचा हक्क असला पाहिजे, तो प्रत्येक स्त्रीला मिळाला पाहिजे या गोष्टीवर भर देणे गरजेचे आहे. तसेच स्त्रियांचे या विषयावर प्रबोधन करणेही तितकेच गरजेचे झाले आहे. गर्भपात करणे हे पाप किंवा गुन्हा नसून स्त्रियांच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा अधिकार असून तो प्रत्येक स्त्रीला विना अडचण मिळाला पाहिजे.

शासकीय दवाखान्यात तर ही सुविधा मोफत पुरवली जाते या गोष्टीची प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात होणे जास्त गरजेचे आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करता समाजाची मानसिकता बदलण्याबरोबरच गर्भपात कायद्यामध्येही थोडाफार बदल करणे ही तितकेच गरजेचे आहे.



## सीता बनसोड

सामाजिक कार्यकर्त्या, केज (बीड)

मी गेली सोळा वर्षापासून संस्था तसेच संघटनेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न व हक्क तसेच महिला अन्याय अत्याचार व दलित अत्याचार विरोधी काम करीत आहे. महिलांवर होणारे कौटुंबिक अत्याचार, बेटी बचाव तसेच महिलांचे व एकल महिलांचे कौन्सीलिंग करते.

महिलांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून सतत काम करत होते. हे सर्व काम करीत असताना 'सम्यक' सोबत जोडली गेले आणि काम करायला एक नवीन आणि अतिशय महत्त्वाचा विषय मिळाला आणि तो म्हणजे महिलांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळाल्या पाहिजे. ह्या विषयाकडे सम्यक सोबत जोडण्यापूर्वी कधीही गांभीर्याने पहिले नव्हते कारण ती समजच नव्हती. एकीकडे पी.सी.पी.एन.डी.टी. कायद्यावर खूप काम करायचे पण सुरक्षित गर्भपातावर (गर्भसमापनावर) काम करणे किती गरजेचे आहे ते सम्यक मुळे कळाले व काम करायला सुरु केले. आता मी ह्या कामाला माझ्या रोजच्या कामाचा भाग बनविला आहे. डॉक्टरांसोबत या विषयावर चर्चा करून त्यांना मर्जी हॉटलाईनचे पोस्टर दिले. तसेच वकील, रोटरी क्लब ऑफ केज व ग्रामसेवक व गटविकास अधिकारी, पत्रकार, अंगणवाडीताई, आशाताई सर्वांना हा मुद्दा पटवून सांगितला. MTP कायद्याविषयी सुरुवातीला डॉक्टर उदासीन व भीतीमध्ये असल्यासारखे वाटत होते. पण वेळोवेळी त्यांच्या सोबत चर्चा करून ते आता सकारात्मक झालेत.

आता माझी ओळख ही फक्त महिला अन्याय अत्याचार विरोधी काम करणारी संस्था किंवा व्यक्ति इतकीच राहिली नाही तर सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळण्यासाठी काम करणारी कार्यकर्ता अशी झाली व मला ती कायम टिकवून ठेवायची आहे.

## ‘मर्जी’ माझ्या शरीरावर माझा हक्क!







PCPNDT कायद्याअंतर्गत लिंगनिदान करता येतील अशा सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानाचे नियमन केले जाते. याचबरोबर MTP कायद्यानुसार ठराविक अटींअंतर्गत केला गेलेला गर्भपात कायदेशीर मानला जातो.

मागील काही वर्षांपासून वरील दोनही कायद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गल्लत केली जात असल्याचे सातत्याने निदर्शनास येत आहे. त्यामुळे१२ ते २० आठवड्यांमध्ये स्त्रियांना जर गर्भपाताची सेवा हवी असेल तर ती नाकारण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसते. स्त्रियांना जर सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळाल्या नाहीत तर त्या असुरक्षित गर्भपाताच्या सेवांचा अवलंब करतात असे अनेक संशोधानांद्वारे आपल्या समोर आले आहे. ही परिस्थिती बघता येत्या काळात असुरक्षित गर्भपातांचे प्रमाण वाढवण्याची भीती आहे.

या पार्श्वभूमीचा विचार करून केंद्र सरकारने सन २०१५ मध्ये "Guidance Book: Ensuring Access to Safe Abortion and Addressing Gender Biased Sex Selection" ही पुस्तिका तयार केली. याअंतर्गत PCPNDT आणि MTP कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा, सेवा पुरवठादार आणि संवाद साहित्य तयार करणाऱ्या संस्था या सर्वांसाठी मार्गदर्शन देण्यात आले आहे. या पुस्तिकेचा मराठी अनुवाद ‘सम्यक’ मार्फत २०१६ मध्ये करण्यात आला. PCPNDT आणि MTP या दोन्ही कायद्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी ही मार्गदर्शक पुस्तिका अतिशय महत्त्वाची आहे आणि महाराष्ट्रभरात प्रत्येक जिल्ह्यामध्ये या पुस्तिकेचा वापर केला गेला पाहिजे.

मराठी मार्गदर्शक पुस्तिका मोफत वितरणासाठी ‘सम्यक’ मध्ये उपलब्ध आहे. आपणास हवी असल्यास आपण ‘सम्यक’च्या पत्त्यावर आमच्याशी संपर्क करू शकता.

■■■

## पुढील अंकाचा विषय : प्रसार माध्यमे आणि सुरक्षित गर्भपात

**मर्जी**
माझ्या शरीरावर माझा हक्क
एप्रिल - जून, २०१६
अंक चौथा

**कार्यकारी संपादक**
आनंद पवार

**संपादक मंडळ**
मिलिंद चव्हाण, डॉ. गोरख मंद्रुपकर
मनीषा तोकले, ज्योती भालकर,
प्रितम पोतदार

**मांडणी व छपाई**
संस्कृती डिझायनर्स, पुणे

खाजगी वितरणासाठी

**बुक-पोस्ट**

सम्यक
संवाद व संसाधन केंद्र, पुणे

SAAF Fondo de Acción para el Aborto Seguro

IPPF

**प्रकाशक:**
**सम्यक - संवाद आणि संसाधन केंद्र**
बी३/१४, दामोदर नगर, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे ४११०५१
**फोन :** +९१ ९४०३५१६२३७ **ईमेल :** samyak.pune@gmail.com